
‘मधुक्रांती-२०२०’



मधुवार्ता

# ‘कॉलनी कोलॅप्स डिसीज’ (C.C.D.) एक गंभीर समस्या!

अनेक देशांमध्ये मधमाशी पालनाला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले जाते आणि त्याचा वापर परागीभवनासाठी जास्तीत जास्त करण्यात येतो. मधमाशी पालन हा एक मोठा उद्योग झाला असून, त्यापासून हजारो कोटी रुपयांचे उत्पादन मिळते. परंतु मागील दशकापासून ‘कॉलनी कोलॅप्स डिसीज’ (C.C.D.) म्हणजेच मधमाश्यांची पूर्ण वसाहत नष्ट करणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे दरवर्षी अनेक देशांमध्ये ३० टक्क्यांपर्यंत मधमाश्यांची संख्या कमी होत आहे. परिणामी मधमाशी पालकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.



**लक्षणे** : या रोगाची लक्षणे म्हणजे मधमाश्यांची कार्यक्षमता कमी होणे आणि त्यांचे कार्य मंदावणे. यामध्ये मधमाश्यांची पिलावळ मरण्याचे प्रमाण वाढते, हळूहळू वसाहतीमध्ये मधमाश्यांची संख्या कमी होऊन पूर्णपणे वसाहत नष्ट होते. या प्रकारचा रोग होण्याची वेगळीवेगळी कारणे सांगितली जातात. विशेषत: रासायनिक कीटकनाशकांच्या वापरामुळे; त्यातल्या त्यात एकापेक्षा जास्त रासायनिक कीटकनाशके तसेच बुरशीनाशके एकत्र करून त्यांचा वापर पिकांवर केला आणि तेथे मधमाश्यांचा वावर असला, तर या प्रकारचा आजार वाढण्यास मदत होते. तसेच वरोआ डिस्ट्रक्टर नावाचा माईट (कोळी) मधमाश्यांवर वाढतो. तो मधमाश्यांचे रक्त शोषण करून मधमाश्यांची कार्यक्षमता कमी करतो. हा माईट कीटकनाशकांना जास्त प्रतिकारक्षम असल्यामुळे त्याचे लवकर नियंत्रणही होत नाही. या माईटचे नियोजन न झाल्यामुळे मधमाश्यांच्या वसाहतीमध्ये त्यांचे प्रमाण वाढते. अनेक वेळा सल्फर किंवा इतर माईटीसाईडस्‌चा वापर करूनही योग्य तो फायदा होत नाही. त्यामुळे या माईटचे प्रमाण वसाहतीमध्ये वाढून वसाहतीमधील मधमाश्या कमी होतात. तसेच रासायनिक कीटकनाशकांचे अंशही वसाहतीमध्ये वाढतात. या सर्वांचा परिणाम म्हणजे रोगाचे प्रमाण वाढून वसाहत उध्वस्त होते.



**उपाययोजना** : या रोगापासून वसाहतीचे संरक्षण करणे गरजेचे आहे. यासाठी अनेक मधपाळ एक-दोन वर्षांतून वसाहतीमध्ये बदल करतात किंवा नवीन वसाहती घेतात. वसाहतीमध्ये रासायनिक अंश तसेच माईटचा प्रादुर्भाव वाढत असल्यास त्यातील चांगल्या फ्रेम्स बाजूला करून बाकीच्या फ्रेम्स नष्ट कराव्यात. बी-ब्रीडिंग सेंटरमध्येच माईटला प्रतिकारक्षम असलेल्या मधमाश्यांची निवड करून, त्या वसाहतीमध्ये राणी माशी तयार करून त्यापासून जास्तीत जास्त वसाहती तयार करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे वसाहतींची स्वच्छता चांगली ठेवणे आणि ज्या भागात कीटकनाशकांचा जास्त वापर आहे, तेथून वसाहती दूर ठेवणे या बाबींची काळजी घेतली तर या रोगापासून संरक्षण मिळू शकते. चांगल्या प्रजातीच्या राणी माशीपासून वसाहत निर्मिती, निसर्गातील चांगल्या प्रजातींची निवड आणि योग्य देखभाल ठेवली तर आपण या रोगावर चांगले नियंत्रण ठेवू शकतो.

**(सौजन्य : ‘पूर्वा कृषिदूत’ परिवार)**